RNI No. MAHBIL/13/2/2011-TC
www.dgps.maharashtra.gov.in

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ-नाशिक विभाग

वर्ष - ९, अंक - ९ ] सोमवार, फेब्रुवारी १०, २०२० / माघ २१, शके १९४१ [ पृष्ठे ०२

**असाधारण क्रमांक ९**

## प्राधिकृत प्रकाशन

**आयुक्त, महानगरपालिका यांजकडून**

**जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव**

**पोट-निवडणूक - २०२०**

क्रमांक जशमनपा/पोट-नि-२०७१/२०२०.– महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९, अनुसूची ‘ड’, प्रकरण १, निवडणूक नियम क्रमांक- ३९ *(२)* व राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०१९/प्र. क्र. १३/का-५, दिनांक ४ जानेवारी २०२० नुसार मी, डॉ. अविनाश ढाकणे, आयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव या प्रकटनाद्वारे असे जाहीर करतो की, जळगाव शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १९-अ च्या दिनांक ६ फेब्रुवारी २०२० रोजी होणाऱ्या पोट-निवडणुकीकरिता निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांपैकी एकच उमेदवार शिल्लक राहिल्यामुळे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०२०/ प्र.क्र. १३/का-५, दिनांक ४ फेब्रुवारी २०२० अन्वये सदर उमेदवार बिनविरोधी विजयी घोषित करणेस हरकत नसल्याचे कळविल्याप्रमाणे खालील उमेदवार त्यांचे नावासमोर नमूद केलेल्या प्रभागातून महानगरपालिका सदस्य म्हणून बिनविरोध निवडून आलेले आहेत.

**परिशिष्ट**

| प्रभाग क्रमांक | जागा क्रमांक | निवडून आलेल्या महानगरपालिका सदस्याचे नाव | सदस्याचा पत्ता | पक्ष | शेरा (जर जागा राखीव असेल तर कोणासाठी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १९ | अ | सौ. निता मंगलसिंग सोनवणे | गट नंबर ३०, प्लॉट नंबर ५७, हनुमान मंदिराजवळ, मुक्ताईनगर, जळगाव. | शिवसेना | अनुसूचित जमाती (महिला). |

**डॉ. अविनाश ढाकणे,**
आयुक्त,
जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव.

जळगाव, १० फेब्रुवारी २०२०.

## आयुक्त तथा निवडणूक अधिकारी यांजकडून

### अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

### पोट-निवडणूक - २०२०

क्रमांक साप्रवि/पोट-निवडणूक-६९६/२०२०.– अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६-अ ची पोट-निवडणूक घेण्याबाबत मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा २०१९/प्र. क्र. १३/का-०५, दिनांक ४ जानेवारी २०२० अन्वये पोट-निवडणूक - २०२० च्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार प्रभाग क्रमांक ६-अ च्या जागेसाठी दिनांक ६ फेब्रुवारी २०२० रोजी पोट-निवडणुकीसाठी मतदान घेण्यात आले.

अहमदनगर महानगरपालिका, पोट-निवडणूक - २०२० साठी प्रभाग क्रमांक ६-अ चा मतमोजणीचा निकाल दिनांक ७ फेब्रुवारी २०२० रोजी जाहीर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ‘ड’, प्रकरण १, निवडणूक नियम ३९ *(२)* व मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०१९/प्र. क्र. १३/का-०५, दिनांक ४ जानेवारी २०२० च्या पोट-निवडणूक कार्यक्रमानुसार निवडून आलेल्या महानगरपालिका सदस्याचे नाव, राहण्याचे ठिकाण (पत्ता), पक्ष व आरक्षण याबाबतची माहिती मी, राहुल द्विवेदी, आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, पोट-निवडणूक - २०२०, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर याद्वारे खालीलप्रमाणे प्रसिद्ध करीत आहे.

**परिशिष्ट**

| प्रभाग क्रमांक | नवनिर्वाचित सदस्याचे नाव | पत्ता | पक्ष | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ६-अ | जाधव पल्लवी दत्तात्रय | प्लॉट नंबर ९६, पंचरत्न निवास, सूर्यानगर, औरंगाबाद रोड, अहमदनगर. | भारतीय जनता पार्टी | अनुसूचित जमाती (महिला). |

**राहुल द्विवेदी,**
आयुक्त तथा निवडणूक अधिकारी,
पोट-निवडणूक - २०२०,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर, ७ फेब्रुवारी २०२०.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.